# महावितरण

## *महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादित*

### सेवायोजन जाहिरात क्र. २/२०१३

**विद्युत वितरण क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्यादितच्या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येणाऱ्या कार्यालयाकरिता कनिष्ठ सहाय्यक पदे सरळसेवा भरतीद्वारे ३ (तीन) वर्षाच्या कंत्राटी कालावधीसाठी भरणेकरिता कार्यक्षम आणि पात्र अशा इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑन लाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**<u>रिक्त पदांचा घोषवारा</u>**

| पदाचे नांव | अ.जा | अ.ज | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ सहाय्यक | ५५ | १०५ | ३१ | १३ | ४६ | २५ | १० | ८५ | ३२० | ६९० |

**टीप :** १) शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ/प्रक्र४१५/का-२, दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील. (महिला आरक्षणांतर्गत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ०१/०४/२०१३ नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.)

२) अपंग प्रवर्गासाठी एक हात बाधित (OA), एक पाय बाधित (OL), एक हात आणि एक पाय बाधित (OAL), दोन पाय बाधित, (BL), क्षीणदृष्टी, (LV), श्रवणशक्तीतील दोष (HH), अंध (B) याकरिता एकूण ३ टक्के आरक्षण राहील. अपंग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्यापेक्षा कमी नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार नवी दिल्ली क्र. ३६०३५/३/२००४ ईएसटीटी(आरईएस), दि.२९/१२/२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पात्र उमेदवारांमधून शासन पत्र क्र.अपंग-२००२/ प्र.क्र.३३१/सुधार-३, दि. ०७/०६/२००६ अनुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३) माजी सैनिकांसाठी १५ टक्के आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. अशा माजी सैनिकांनीच अर्ज सादर करावेत अन्यथा त्यांचा अर्ज स्विकारला जाणार नाही.

४) शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दिनांक २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना ५ टक्के व भूकंपग्रस्त व्यक्तींना २ टक्के आरक्षण राहिल.

५) तदर्थ मंडळ अथवा महावितरण कंपनीमध्ये यशस्वीरित्या शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीकरिता १० टक्के पदे राखीव ठेवण्यात आली आहेत. ज्या उमेदवारांनी तदर्थ मंडळ अथवा महावितरण कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केलेले आहे अशा उमेदवारांचा या राखीव पदांकरिता विचार करण्यात येईल.

६) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूंसाठी २ टक्के आरक्षण राहील. खेळाडूंची कामगिरीविषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल, २००५ चे परिशिष्ट - ब येथे दिलेल्या प्राधिकाऱ्याने विहित नमुन्यात घेऊन संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रमाणित केलेली असावीत.

७) महिला, माजी सैनिक व शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी यांचेसाठी आरक्षण हे समांतर आरक्षण असल्याने या आरक्षणांतर्गत निवड झालेले पात्र उमेदवार हे त्या त्या पदाच्या अनुशेष निहाय आरक्षणाखाली उदा. अ.जा., अ.ज., वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. व खुल्या प्रवर्गातील राखीव जागांवर दर्शविण्यात येतील.

८) जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे, आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत/आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

## वेतन

**तीन वर्षाच्या कंत्राटी कालावधी करीता निवड झालेल्या उमेदवारांना खालीलप्रमाणे प्रतिमहा वेतन देण्यात येईल :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रथम वर्ष | - | एकूण वेतन रुपये ८,०००/- |
| २) | द्वितीय वर्ष | - | एकूण वेतन रुपये ९,०००/- |
| ३) | तृतीय वर्ष | - | एकूण वेतन रुपये १०,०००/- |

**टिप :** उपरोक्त वेतनातून भविष्य निर्वाह निधी, आयकर, व्यवसाय कर इत्यादी वजावट करण्यात येईल. त्याचप्रमाणे जे उमेदवार वाणिज्य शाखेतील पदवी नंतरची पदव्युत्तर पदवी (एम.कॉम./एम.बी.ए . फायनांन्स् अथवा वाणिज्यिक किंवा वित्तिय क्षेत्राशी निगडीत असणारी पदविका) धारण केलेल्या उमेदवारांना प्रतिमहा रु. १,०००/- अतिरिक्त वेतन देण्यात येईल. जाहिरातीच्या शेवटच्या तारखे नंतर जे उमेदवार पदवी नंतरची पदव्युत्तर पदवी किंवा पदविका धारण करतील अशा उमेदवारांना अतिरिक्त रुपये १०००/- दिले जाणार नाहीत.

**दिनांक १७/०१/२०१४ रोजी शैक्षणिक अर्हता**

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील (बी.कॉम) पदवी **आणि**

२) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे ‘‘सी.सी.सी. ’’ किंवा ‘‘ओ’’ स्तर किंवा ‘‘ए’’ स्तर किंवा ‘‘बी’’ स्तर किंवा ‘‘सी’’ स्तर स्तरावरील प्रमाणपत्र **अथवा** ए.आय.सी.टी.ई चे ‘‘संगणक / माहिती तंत्रज्ञान’’ या विषयातील पदवीका प्रमाणपत्र **अथवा** एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र आसणे आवश्यक आहे

**टिप : उमेदवाराने मान्यता प्राप्त विद्यापीठातील संगणक / माहिती तंत्रज्ञान या विषयातील उच्चस्तर पदवी संपादन केली असल्यास अशा उमेदवारांना अनुक्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.**

**दिनांक १७/०१/२०१४ रोजी वयोमर्यादा (याकरिता फक्त एस.एस.सी. प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल)**
दिनांक १७/०१/२०१४ रोजी वयोमर्यादा किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल वय ३० वर्षे असावे.

**टीप :**
१) मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.
२) अपंग उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा १० वर्षांनी शिथिलक्षम राहील.
३) तदर्थ म.रा.वि.मंडळ/महावितरण कंपनीमध्ये यशस्वीरित्या शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पुर्ण केलेल्या शिकाऊ उमेदवारांना त्यांच्या प्रशिक्षण कालावधी (१-२ वर्ष) इतकी कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.
४) महावितरण कंपनीतील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही.
५) माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षाची राहील.

## <u>सर्वसाधारण अटी :-</u>

१) जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेली प्रवर्गनिहाय पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे. आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत/आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही. उमेदवारांची निश्चित कालावधीमधील कामगिरी, रिक्त पदांची उपलब्धता आणि आवश्यकतेनुसार तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी पुर्ण झाल्यानंतर निम्नस्तर लिपिक या नियमित पदावर कंपनीच्या सेवेमध्ये सामावून घेण्यात येईल.

२) जाहिरातीतील नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांनीच अर्ज करावा.

३) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ०८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/०१/२००४ पासून अंमलात आणला आहे. सदर अधिनियमानुसार फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना सोडून उर्वरित मागासवर्गातील सर्व जाती प्रवर्गातील म्हणजे वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इतर मागासवर्ग याना उन्नत/प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व लागू केले आहे. त्या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ०१/०४/२०१३ नंतरचे किंवा जाहिरातीच्या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

४) मागास प्रवर्गातील उमेदवारांनी जातीच्या दाखल्याबरोबरच जात पडताळणी समितीने वैध ठरविलेले **"जाती वैधता प्रमाणपत्र"** सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ नुसार जाती वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता संबंधित जात वैधता समितीस आवश्यक ते दस्ताऐवज सादर केल्याची पोहोच केल्यानंतरच **<u>तात्पुरती</u>** स्वरुपाची नियुक्ती देण्यात येईल. जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही सर्वस्वी सदर उमेदवाराची जबाबदारी राहील.

५) मागासवर्गीय उमेदवाराची गुणवत्तेवर निवड झाल्यास त्याची निवड ही खुल्या प्रवर्गात झाल्याचे समजण्यात येईल.

६) शासकीय / निमशासकीय / महामंडळ तसेच इतर वीज कंपन्यांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विभागामार्फत / योग्य अधिकारी वर्गामार्फत अर्ज करावा. **अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांच्या पूर्वीच्या कंपनीच्या / संस्थेच्या सेवेची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही.**

७) महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

## <u>अर्ज करण्याची पध्दत</u> :

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने ऑनलाईन परिक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व माहिती http;//www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करु शकतात. खाली दर्शविलेल्या लिंकवर ऑन लाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. (Guidelines for online application are available on the link below.)

२) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. **याकरिता उमेदवाराने स्वत:चा ई-मेल आय.डी ऑनलाईन नमूद करणे आवश्यक आहे.** उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करणे बंधनकारक आहे. अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा फोटो (रुंदी ३.५से.मी xउंची ४.५ से.मी) व स्वत:चा ईमेल आयडी असणे आवश्यक आहे स्वत:चा विहित आकारातील फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावी. याकरिता एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. तसेच विहित आकारामध्ये काळ्या शाईच्या पेनने चौकोनात स्वाक्षरी करावी. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित (Attested) करु नये. वरील सूचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त फोटो स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन

करता येईल. फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेज स्कॅन करुन **jpg** फॉर्मेटमध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (Save) करावी. फोटो व स्वाक्षरीची दोन्हीची मिळून संपूर्ण इमेज ५० Kb + २० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dip resolution, no.of colours, etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे. खाली दर्शविलेल्या लिंकवर फोटो व स्वाक्षरी (सही) अपलोड करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. (Guidelines for uploading the Photograph and Signature are available on the link below.)

३) उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे आवेदन शुल्क ऑनलाईन / ऑफ लाईन (On-line /Off-line) पध्दतीने भरावयाचे आहे. सदर आवेदन शुल्क हे **''ना परतावा''** राहील व कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. **अपंग आणि माजी सैनिक उमेदवारांकरिता सदर आवेदन शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.**

खुल्या प्रवर्गातील उमेदवार : रु. ४००/-
मागासवर्गीय उमेदवार : रु. २००/-

**वर दर्शविलेल्या आवेदन शुल्का व्यतिरिक्त उमेदवारास रु. १०/- अतिरिक्त बँक चार्जेस भरावे लागतील.** (Guidelines for Online / Off-line payment are available on the link below.)

४) विहित नमुन्यातील ऑन लाईन अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावर दिनांक **२७/१२/२०१३** पासून उपलब्ध राहतील. सदर ऑन लाईन अर्ज भरण्याची अंतीम तारीख **१७/०१/२०१४ (२३:५९ वाजेपर्यंत)** राहील. उमेदवारांचे फक्त ऑनलाईन भरलेले अर्जच स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

५) अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राह्य धरण्यात येतील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

६) उमेदवारांची कनिष्ठ लेखा सहाय्यक पदासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेची रूपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र व बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती कंपनीच्या संकेत स्थळावर (Website) वर उपलब्ध राहील.

७) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्रांची साक्षांकित केलेली प्रत कंपनीने मागणी केल्यानंतर सादर करावी.

८) ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर दाखला, वैद्यकीय दाखला, खेळाची प्रमाणपत्रे, प्रकल्पग्रस्ताचा व भूकंपग्रस्ताचा दाखला इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडुन सिस्टम जनरेटेड अर्जासोबत **कंपनीने मागणी केल्यानंतर** सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी मागणी केल्यानंतर सादर केलेल्या अर्जाची छाननी नेमणुक देण्यापुर्वी अथवा त्यानंतर अन्य कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

९) अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१०) शासकीय / निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

११) कंपनीने ऑनलाईन सिस्टम जनरेटेड अर्जाची मागणी केल्यानंतर आनलाईन अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सदर प्रती केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोष्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबतीत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्यात.

## <u>निवड पध्दती :</u>

१) अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षा ही पदांसाठी आवश्यक असलेली किमान अर्हता, सामान्यज्ञान व पदासाठी आवश्यक असणाऱ्या ज्ञानावर आधारित राहील. परीक्षेचे माध्यम इंग्रजी असून त्यात मराठी भाषेच्या ज्ञानाची चाचणी घेण्याकरिता काही प्रश्न मराठी भाषेवर विचारण्यात येतील.

२) ज्या उमेदवारांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे अशा सर्व उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरिता बोलविण्यात येईल. उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाची छाननी ऑनलाईन परीक्षेच्या वेळी केली जाणार नाही. तथापि, निवड झालेल्या उमेदवारांच्या अर्जाची छाननी नेमणुकीपुर्वी करण्यात येईल. ऑनलाईन अर्जामध्ये दर्शविलेल्या माहिती पृष्टर्थ योग्यते दस्ताऐवज जमा करणे ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी राहील. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

३) ऑनलाईन परीक्षेकरिता बोलविलेल्या उमेदवारांची यादी कंपनीच्या संकेत स्थळावर www.mahadiscom.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरिता स्वतंत्रपणे **आवेदनपत्र** पाठविण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी कंपनीच्या संकेतस्थळावरुन आवेदन पत्र **डाऊनलोड** करुन घेऊन त्यामध्ये माहिती भरावयाची आहे. **ऑनलाईन परीक्षा सर्वसाधारणपणे माहे फेब्रुवारी २०१४ मध्ये राज्यातील विविध ठिकाणी घेण्यात येईल**. ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेश पत्रावर परीक्षा केंद्राचा तपशील देण्यात येईल. परीक्षा केंद्र कार्यान्वयीत करण्याकरिता आवश्यक असलेले उमेदवार नोंदणी झालेले नसल्यास सदरचे परीक्षा केंद्र कार्यान्वयीत करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे एखाद्या परिक्षा केंद्रावर क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांची नोंदणी झाल्यास सदरच्या परीक्षा केंद्राचे उमेदवार उपलब्धतेनुसार नजिकच्या परीक्षा केंद्रावर वर्ग करण्यात येतील. परीक्षा केंद्रामध्ये बदल करण्याची उमेदवारांची मागणी स्विकारली जाणार नाही.

४) **उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेकरिता स्वखर्चाने यावे लागेल. याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येणार नाही.**

५) पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेऊन **ऑनलाईन परीक्षेमधील गुणवत्तेच्या आधारे एकत्रित निवडसूची तयार करण्यात येईल.** सदरची निवडसूची कंपनीच्या संकेत स्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) निवडसुची बनविताना ज्या उमेदवारांचे एकत्रपणे मिळविलेले गुण समान असतील त्यामधील म.रा.वि.मंडळाचे / महावितरण कंपनीचे ॲप्रेंटिसशिप पूर्ण केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. दोन किंवा अधिक बहिस्थ उमेदवारांचे त्याचप्रमाणे दोन किंवा अधिक प्रशिक्षणार्थीचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेऊन त्यांच्यातील ज्येष्ठता क्रम ठरविण्यात येईल.

**७) निवड झालेल्या उमेदवारांनी ऑनलाईन सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे, खेळामधील प्राविण्य, शारिरिक बाधित / व्यंगत्वाचे प्रमाण इत्यादी सिद्ध करणे हे सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहिल. <u>यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिद्ध करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.</u>**

८) निवड झालेल्या उमेदवारांना रिक्त पदे व अनुशेषाच्या अनुषंगाने कंपनीच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणत्याही ठिकाणी तीन वर्षे कंत्राटी कालावधीकरिता परिमंडल कार्यालयाकडे वर्ग करता येईल.

९) प्रतिक्षा यादी बनविताना सामाजिक आरक्षण विचारात घेतले जाईल आणि इतर समांतर आरक्षण लागू होणार नाही.

१०) उमेदवाराने एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास, अशा उमेदवारांच्याबाबतीत त्यांचा शेवटचा अर्ज व त्या मधील माहिती ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंदी रद्दबातल समजल्या जातील व इतर अर्ज अपोआप रद्द होतील.

**<u>महत्वाच्या तारखा :</u>**

| | |
|---|---|
| **ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी** | **२७/१२/२०१३ ते १७/०१/२०१४** |
| **बँकेमध्ये (Offline) फी भरण्याचा कालावधी** | **२३/०१/२०१४** |
| **सर्वसाधारणपणे ऑनलाईन परीक्षेचे आवेदन पत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक** | **१४/०२/२०१४** |
| **सर्वसाधारणपणे ऑनलाईन परिक्षेचा दिनांक** | **२२,२३ फेब्रुवारी २०१४** |
| **सर्वसाधारणपणे निवडसुची घोषित करण्याचा दिनांक** | **मार्च २०१४ च्या पहिल्या आठवड्यामध्ये** |
| **निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची छाननी व प्रशिक्षण** | **एकलहरे, नाशिक, अमरावती व सांगली येथे सर्वसाधारणपणे मार्च २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यामध्ये** |

**<u>इतर अटी :</u>**

१) जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही **'किमान'** अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकणार नाही.

२) अर्ज करणाऱ्या प्रत्येक उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. **उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी (Domicile) असला पाहिजे.**

३) **निवड झालेले उमेदवार कंपनीच्या सेवेत ३ वर्षाचा कंत्राटी कालावधी समाधानकारकपणे पुर्ण केल्यानंतर निम्नस्तर लिपिक या पदावर अनुशेष आणि रिक्त पदे यांच्या अनुषंगाने सामावून घेतले जातील. निम्नस्तर लिपिक पदावर रुजू झाल्यानंतर त्यांना मुळ वेतना व्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते इत्यादी कंपनीच्या नियमांप्रमाणे मिळण्यास पात्र ठरतील.**

४) भरती प्रक्रिये दरम्यान जर एखाद्या उमेदवारांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

५) जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

६) भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रचार / हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) मागासवर्गीयांनी खुल्या प्रवर्गाअंतर्गत अर्ज केला असल्यास तो नमुद केलेला विकल्प बदलता येणार नाही. संबंधित मागासवर्गीयांस सर्व बाबी खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून समजण्यात येईल.

८) निवड झालेल्या उमेदवारास रिक्त पद आणि अनुशेष याच्या अनुषंगाने परिमंडल कार्यालयाकडे कंत्राटी तत्वावर सविस्तर पदस्थापनेकरिता वर्ग करण्यात येतील. अशा उमेदवारांना परिमंडलाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयाच्या ठिकाणी रिक्त पदाच्या उपलब्धतेनुसार नियुक्त करण्यात येईल, याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

९) निवड झालेल्या उमेदवारांची ३ वर्षाच्या कंत्राटी कालावधीमध्ये बदलीकरिताची विनंती मान्य केली जाणार नाही.

१०) निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहील.

११) जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतःबदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

१२) **निवडीच्या कोणत्याही टप्प्याला उमेदवार विहित अर्हता / अनुभव धारण करीत नसल्याचे किंवा त्याचे पूर्वीचे चरित्र गैरवर्तणूकीचे आढळल्यास त्याची उमेदवारी / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.**

१३) निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निवडीच्या तारखेपासून एक वर्षाची राहील. त्यानंतर ही निवड सूची नियमाप्रमाणे व्यपगत होईल.

*********

**(Guidelines for online application are available on the link below.)**

Candidates are required to apply Online through website www.mahadiscom.in . No other means / mode of application will be accepted.

(i) Candidates are required to have a valid personal email ID. It should be kept active during the currency of this recruitment. The Company will send intimation about call letters for online Test, Interview etc. through the registered email ID. Under no circumstances, he / she should share / mention email ID to / or of any other person.

(ii) Candidates should upload the scanned image of photograph and signature in the online application. The candidate should have a scanned (digital) image of his / her photograph and signature as per the specification given below in JPG format not exceeding 50 KB and 20 KB respectively and upload the photograph and signature. The online application will not be registered unless the candidate's photo and signature is uploaded after completion of the entry in online mode.

(iii) In case, a candidate does not have a valid personal email ID, he / she should create his/ her new email ID before applying Online.

(iv) The name of the candidate or his / her father / husband name, caste etc. should be spelt correctly in the application as it appears in the certificates / mark sheets. Any change / alteration found may disqualify the candidature.

(v) Candidates are required to download the call letters for online examination / interview from Company's website by entering their registration number and password which are generated by the system on submitting the online application and are intimated to the candidates by e-mail/SMS. Candidates are advised to preserve these details for future use. Call letters for Online Written Test and Interview will not be dispatched by post or courier etc..

(vi) After applying online and uploading the photograph and signature, the candidates are advised to take two printouts of the system generated online application form. Recent photograph of the candidate duly signed across is to be pasted on the system generated online application.

(vii) The candidates are advised to take utmost care in filling up the required columns in the online mode, payment of fees etc. and ensure that the details entered in the appropriate columns are correct before submission, since there is no provision to modify the application after submission.

(viii) The registration number and Password generated after applying online must be carefully retained by the candidate for his / her record.

(ix) Candidates are advised in their own interest to apply online much before the closing date and not to wait till the last date to avoid the possibility of disconnection / inability / failure to log on the Bank's website on account of heavy load on internet / website jam.

## (Guidelines for Online / Off-line payment are available on the link below.)

**Mode of Payment**

**(1) Payment of fees/ intimation charges via the ONLINE MODE**

(i) Candidates should carefully fill in the details in the On-Line Application at the appropriate places very carefully. In the event of the candidate not able to fill the data in one go, or wishes to cross-check it before submitting, he/she can save the data already entered. When the data is saved, provisional registration number and password will be generated by the system and displayed on the screen. Applicants should note down the provisional registration number and password. Email & SMS indicating the provisional registration number and Password will be sent. Applicants can reopen the saved data using provisional registration number and password and edit the particulars, if needed. This facility will be available for three times only. Once the application is completely filled, applicant should submit the data by pressing the submit button appearing on the application.

(ii) Once the application is filled in completely, candidate may click on the "SUBMIT" button at the end of the On-Line Application format.

(iii) Before pressing the "SUBMIT" button, candidates are advised to verify every field filled in the application. No change/edit will be allowed after submission.

(iv) The application form is integrated with the payment gateway and the payment process can be completed by following the instructions.

(a) The payment can be made by using only Master/Visa Debit or Credit cards or Internet Banking by providing information as asked on the screen.

(b) In case candidates wish to pay fees/ intimation charges through the online payment gateway after the upload of photograph and signature an additional page of the application form is displayed wherein candidates may follow the instructions and fill in the requisite details.

(c) If the online transaction has been successfully completed a Registration Number and Password will be generated. Candidates should note their Registration Number and Password for future reference.

(d) If the online transaction has not been successfully completed then the following message is displayed 'Your online transaction was unsuccessful. Please register again' Candidates may then revisit the 'Apply Online' link and fill in their application details again.

(e) On successful completion of the transaction, an e-receipt will be generated.

(f) Candidates are required to take a printout of the e-receipt.

Note: After submitting your payment information in the online application form, please wait for the intimation from the server, DO NOT press Back or Refresh button in order to avoid double charge.

**(2) Payment of fees/intimation charges via OFFLINE MODE:**

(i) Payment of fee/ intimation charges through the offline mode can be made through the CBS branches of Bank of Maharashtra .

(ii) Candidates should carefully fill in the details in the On-Line Application at the appropriate places very carefully. Candidates are advised to verify every field filled in the application. In the event of the candidate not able to fill the data in one go, or wishes to cross-check it before submitting, he/she can save the data already entered. When the data is saved, provisional registration number and password will be generated by the system and displayed on the screen. Applicants should note down the provisional registration number and password. Email & SMS indicating the provisional registration number and Password will be sent. Applicants can reopen the saved data using provisional registration number and password and edit the particulars, if needed. This facility will be available for three times only. Once the application is completely filled, applicant should submit the data by pressing the submit button appearing on the application. **Applicants should take a printout of the system generated fee payment challan immediately. No change/edit will be allowed thereafter. The registration at this stage is provisional.**

(iii) Fee payment will be accepted at the CBS branches of Bank of Maharashtra from 2$^{nd}$ working day after registration and can be made within three working days. System generated fee payment challan will be used for depositing fee (For example: If one has registered on 18-09-2013 then he/she will be able to deposit the fee from 20-09-2013 to 23-09-2013 considering 22-09-2013 is a non-working day).

(iv) Once fee has been paid, the registration process is completed. Candidate will receive registration confirmation by SMS/e-mail after two working days from the date of payment of fees/ intimation charges.

(v) Please ensure to furnish correct Mobile number / email address to receive the registration confirmation.

Note : There is also a provision to reprint the submitted application containing fee details, three days after fee payment.